RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ७, अंक ४८] बुधवार, नोव्हेंबर ३, २०२१/कार्तिक १२, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ६४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कारप्राप्त व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी पदी नेमणूक.**

### जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांजकडून

**वाचा.**—शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक विकाअ. १११५/प्र.क्र. ८८/५, दिनांक ३१ डिसेंबर २०१५.

निर्णय क्रमांक गृह/क-१/टे-५/विकाअ/कावि. २२९९०/२०१९.—उपोद्घातातील शासन निर्णयान्वये अ.क्र. १ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून मी, **राजेश ज. नार्वेकर, जिल्हाधिकारी, ठाणे** आता खालील नमूद केलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ठाणे जिल्ह्यातील गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त झालेल्या व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. ही नियुक्ती त्यांच्या वयाच्या ७० वर्षांपर्यंत चालू राहील व वयाच्या ७० वर्षांनंतर त्यांना अनर्ह ठरवण्यात येईल. तसेच सदर व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्याविरुद्ध गुन्ह्याची नोंद आढळल्यास अथवा फौजदारी गुन्ह्याखाली शिक्षा झाली किंवा त्यांच्याविरुद्ध गंभीर स्वरुपाचा गुन्हा नोंदविण्यात आला किंवा कोणत्याही न्यायालयाने त्यास नादार ( bankrupt ) जाहीर केल्यास सदरची नियुक्ती संपुष्टात येईल.

२. **विशेष कार्यकारी अधिकारी पुढे उल्लेख केलेली कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम राहतील :—**

**(एक) साक्षांकनाचे काम.**—विशेष कार्यकारी अधिकारी हे केवळ “साक्षांकनाचे” काम करतील. मूळ कागदपत्रे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्यांनी साक्षांकन करू नये. तसेच उपोद्घातातील शासन निर्णयामधील परिशिष्ट “५” मधील रबरी शिक्क्यासह मूळ कागदपत्रांच्या छायांकित प्रतींवर न चुकता दिनांकासहित साक्षांकन करावे. मूळ कागदपत्रांपेक्षा वेगळी माहिती नमूद असलेल्या कागदपत्रांवर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकन करू नये. वेगळी माहिती असलेल्या कागदपत्रांवर जर “सत्य प्रत” म्हणून साक्षांकन केल्यास त्यामुळे होणाऱ्या सर्व प्रकारच्या परिणामांकरिता “विशेष कार्यकारी अधिकारी” म्हणून साक्षांकन करणारी व्यक्ती जबाबदार राहील. अशी घटना उघडकीस आल्यास त्या व्यक्तीची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल व तो/ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पुनर्नियुक्तीस अपात्र असेल.

३. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती “मानसेवी” असल्यामुळे विशेष कार्यकारी अधिकाऱ्याला कोणतेही मानधन अथवा वेतन/भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

४. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तीने घरावर, दुकानावर, कार्यालयावर स्वतःच्या नावासह “विशेष कार्यकारी अधिकारी” असा फलक लावावा. त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच त्यांनी सदर फलक काढावेत. तथापि त्यांनी त्यांच्या कुठल्याही वाहनावर “विशेष कार्यकारी अधिकारी” असा उल्लेख करू नये.

५. नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकाऱ्याने साक्षांकनाचे काम करू नये व सर्व साहित्य जिल्हाधिकारी यांचेकडे तात्काळ परत करावे. अन्यथा अशी व्यक्ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पुनर्नियुक्तीसाठी अपात्र ठरेल. नियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकाऱ्याने साक्षांकन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्याचेविरुद्ध जिल्हाधिकारी यांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदवावा.

**अनुसूची**

| वर्ष | शासन निर्णयानुसार जिल्हा क्रमांक | आधारकार्ड नंबर | अ.क्र. | अर्जदाराचे नाव | स्थायी पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| २०१९ | २१ | ९१८४२०७३०७५२ | १ | श्री. ववुवान पंढरीनाथ अर्जुने | रा. एस. एस. १, रूम नं. १००६, सेक्टर ८, कोपरखैरणे, नवी मुंबई. |

ठाणे,
दिनांक ४ जानेवारी २०२०.

**राजेश ज. नार्वेकर**,
जिल्हादंडाधिकारी, ठाणे.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.